# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १७२ वा बुधवार दि.०६ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.





# ठाकरेंना 'अच्छे दिन' येणार

## तेलंगणाच्या विजयानंतर महाराष्ट्रातील काँग्रेस देणार मोठी जबाबदारी



मुंबई : पाच राज्यांच्या निवडणुकीत एका राज्यात म्हणजे तेलंगणात काँग्रेसला विजय मिळाला असून त्या ठिकाणी सत्ता स्थापनेचा दावाही पक्षाने केला आहे. पण तेलंगणाच्या विजयात महाराष्ट्र काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांचेही योगदान आहे. तेलंगणामध्ये त्यांनी केलेल्या मेहनतीची दखल घेऊन काँग्रेसच्या वतीने त्यांना आता मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

माणिकराव ठाकरे हे गेल्या एका वर्षापासून तेलंगणामध्ये काम करत होते. त्यामुळे माणिकराव ठाकरेंना त्या ठिकाणची सर्व परिस्थिती माहिती होती. तेलंगणाच्या विधानसभा निवडणुकीची संपूर्ण जबाबदारी त्यांनी घेतली. त्यामुळे तेलंगणाच्या विजयामध्ये त्यांचा मोठा वाटा मानला जातो. तेलंगणामध्ये काँग्रेसने मोठा विजय प्राप्त केला असून दहा वर्षांनंतर सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

तेलंगणातील विजयानंतर आता महाराष्ट्रातल्या माणिकराव ठाकरेंना अच्छे दिन येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. माणिकराव ठाकरे हे सध्या दिल्लीत पोहोचले असून डी. के. शिवकुमार आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासोबत त्यांची एक बैठक होणार आहे. या बैठकीत तेलंगणाच्या संदर्भात चर्चा होणार असली तरी माणिकराव ठाकरे यांच्या जबाबदारी संदर्भातही चर्चा होण्याची शक्यता आहे.

माणिकराव ठाकरे राजकारणापासून दूर होते

माणिकराव ठाकरे हे एकेकाळी महाराष्ट्र काँग्रेसचे मोठे नेते होते. त्यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. पण मधल्या काळात ते राजकारणापासून दूर झाले होते, राजकारणात सक्रिय नव्हते. मात्र आता तेलंगणाच्या निवडणुकीनंतर, माणिकराव ठाकरे हे पुन्हा सक्रिय होणार असून त्यांना मोठी जबाबदारीही देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. राज्य काँग्रेसमधील एखादे मोठे पदही त्यांना मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष राजीनामा देण्याच्या तयारीत

पुणे : राज्य मागासवर्ग आयोगात राजीनाम्यांचे सत्र सुरूच आहे. महिनाभरात आयोगातील चार सदस्यांनी राजीनामा दिला आहे. आता पाचवा राजीनामा देखील लवकरच दिला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती आनंद निरगुडे पदाचा राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

आयोगाच्या बैठकीतील वैचारिक मतभेदांमुळे आतापर्यंत चार सदस्यांनी राजीनामा दिला आहे. मात्र आता अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या बातमीमुळे अनेक चर्चांना उधाण आले आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती आनंद निरगुडे पदाचा राजीनामा हे कामकाजात सरकारमधील मंत्र्यांच्या लुडबुडीमुळे देत आहेत. ओबीसी आयोगाच्या कामकाजात राज्य सरकारमधील दोन मंत्री आणि न्यायमूर्ती दिलीप भोसले हस्तक्षेप करत असल्याने आपण राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे निरगुडे यांचे म्हणणे आहे. यामुळे मराठा आरक्षणासाठी दाखल करण्यात आलेल्या क्युरिटिव्ह पिटिशनसाठी आवश्यक ती माहिती गोळा करण्यास वेळ लागू शकतो.

सरकारकडून आयोगाच्या सदस्यांवर दबाव

राज्य मागासवर्ग आयोग हा मागासवर्गातील जातीची माहिती गोळा करण्यासाठी आहे. राज्य मागासवर्ग आयोग हा स्वायत्त आहे. आयोग हा स्वायत्त आहे पण माहिती देण्यासाठी आयोगावर सरकारकडून दबाव टाकण्यात आल्याचे सदस्यांचे म्हणणे आहे. सर्वेक्षणातून आलेली माहिती आम्ही तुम्हाला देऊ शकतो, परंतु सरकारला अपेक्षित माहिती देणे आम्हाला शक्य नाही.



ज्ञानाच्या अथांग महासागरास ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दैनिक महावृत्त परिवाराच्यावतीने विनम्र अभिवादन

# सोन्याचा दर ७० हजारांच्या पुढे जाणार?

जळगाव : जागतिक पातळीवर सध्या युद्धजन्य परिस्थिती आहे. त्यामुळे गुंतवणूकदार हे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळले आहेत. त्याचा परिणाम म्हणून सोन्याच्या दरात सध्या वाढ होताना दिसत आहे. गेल्या वर्षभरात सोन्याच्या गुंतवणुकीमधून ग्राहकांना २२ टक्के परतावा मिळाला आहे. त्यामुळे ग्राहकांना ही सोने खरेदी परवडली आहे. येत्या मार्च महिन्यापर्यंत सोन्याचे दर ७० हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतात.

शेअर बाजार वधारला की, सोन्याचे दर घसरत असल्याचे नेहमी पाहायला मिळायचे. मात्र, गेल्या पाच-सहा महिन्यांपासून हा ट्रेंड बदलला आहे. आपल्या देशातील शांततेचे वातावरण आणि चांगली अर्थव्यवस्था ही त्याची कारणं आहेत. त्यामुळे आपल्या देशात गुंतवणूक वाढून सोन्याचे दर आणि शेअर बाजार दोन्ही वधारले असल्याचे पाहायला मिळत आहे. जागतिक पातळीवर सोन्याच्या दरात सध्या वाढ होताना दिसत आहे. येत्या मार्च महिन्यापर्यंत मात्र सोन्याचे दर ७० हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतात.

सोन्याचे दर विक्रमी पातळीवर

सोमवारी सोन्याचे दर हे सर्वाधिक विक्रमी पातळीवर म्हणजे जीएसटीसह ६६००० वर होते. मात्र, त्यानंतर आज सोन्याच्या दरात १२०० रुपयांची घसरण होऊन २४ कॅरेट सोन्याचा जीएसटीसह भाव ६४,८०० रुपये प्रति तोळ्यावर आला आहे.

# नवी मुंबईत संविधान बचाव याञे चे जंगी स्वागत

***रिपब्लिकन सेना सर सेनानी - आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील दिक्षा भुमी ते चैत्यभूमी संविधान बचाव याञे चे आगमन झाले त्यावेळी नवी मुंबई रिपब्लिकन सेनेच्या वतीने विष्णुदास भावे नाट्यग्रुह वाशी नवी मुंबई येथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आनंदराज आंबेडकर म्हणाले की, इव्हीएम मुळे देशाची लोकशाई धोक्यात आली आहे. आणि त्यामुळेच इव्हीएम हटाव लोकतंत्र बचाव..!, संविधान के सन्मान मे हम सब मैदान मे, किसान के सन्मान मे हम सब मैदान मे..! आलेच पाहीजे. आणि २०२४ ची निवडणूक ही आपल्या आस्तित्वाची लढाई आहे कार्यकर्त्यांनी अधीक जोमाने फिल्डवर्क करावे.***

नवी मुंबई / के. एच. हनवते :-

रिपब्लिकन सेना सर सेनानी - आनंदराज आंबेडकर साहेब, व तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष - काकासाहेब खंबाळकर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मुजीब (भाई) पठाण, महीला प्रदेश प्रभारी सारिकाताई शिंदे सह रिपब्लिकन सेना पदाधिकारी यांनी दिक्षा भुमी ते चैत्यभूमी संविधान बचाव याञेची सुरुवात केली. त्याचे नवी मुंबईत आगमन झाले असता अशा भव्य दिव्य संविधान बचाव याञेचे जंगी स्वागत महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष नवी मुंबई जिल्हाध्यक्ष - खाजामिया पटेल, घर हक्क संघर्ष समिती चे अध्यक्ष - हिरामण (दादा) पगार सह रिपब्लिकन सेनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले. त्या आनुशेंगाने विशनुदास भावे नाट्यग्रुह येथे जाहीर सभेचे आयोजन केले होते. त्यात आनेक मान्यवरांनी आपली मनोगत व्यक्त करुन संविधान के सन्मान मे हम सब मैदान मे..! चा नारा बुलंद केला. त्यावेळी नवी मुंबई आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज - कल्याणराव हनवते यांनी इव्हीएम हटाव देश बचाव..! संविधान के सन्मान मे हम सब मैदान मे..! चा लढा आधीक जोमाने तिव्र केला पाहीजे. अता आंबेडकर घराण्याशिवाय या देशाला व समस्त वंचित बहुजन समाजाला पर्याय नाही हेच अता समाजाला ठनकाऊ सांगीतले पाहीजे आसे ही म्हणाले. या कार्यक्रमास समाज सेवक विरेंद्र लगाडे, चंद्रकांत कांबळे, प्रज्ञेश कांबळे, रिपब्लिकन सेना नवी मुंबई ऊपाध्यक्ष नंदकुमार भालेराव, ऐरोली विधानसभाध्यक्ष प्रकाश वानखेडे, वाशी विभाग प्रमुख उमेश खंदारे, नवी मुंबई महिला सचिव दिपा बम, शोभा इंगळे, वनीता बनसोडे, इत्यादी कार्यकर्ते पदाधीकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते. या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन युवा कार्यकर्ता कैलास सरकटे यांनी केले. या संविधान बचाव याञे चा समारोप ६ डिसेंबर रोजी दादर चैत्यभुमी येथे करण्यात येणार आहे आसे जाहीर केले.










## संपादकीय....

# जोमाने अभ्यासाला लागा

दीपावली सुट्टीनंतर शाळा तसेच महाविद्यालये नियमित सुरू झाली आहेत. तेव्हा पुन्हा एकदा विद्यार्थ्यांना जोमाने अभ्यासाला लागले पाहिजे. विशेषत: बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी दीपावलीच्या सुट्टीत काही उपक्रम राबविले असतील, तर ते बाजूला सारून अभ्यासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. त्यात चार दिवसांपूर्वी अवकाळी पाऊस व गारपीट पडल्यामुळे वातावरणात बदल झालेला दिसतो. याचा परिणाम आपल्या आरोग्यावर सुद्धा होत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याकडेसुद्धा लक्ष दिले पाहिजे. जर तब्बेत बरी वाटत नसेल तर आपल्या ओळखीच्या डॉक्टरजवळ जाऊन आरोग्याची तपासणी करावी. म्हणजे योग्यवेळी आरोग्याची काळजी घेतलेली बरी. कारण आता वेळ अतिशय महत्त्वाचा आहे.

त्यात पुन्हा नाताळची सुट्टी आणि नवीन वर्षाचे स्वागत, नंतर वार्षिक परीक्षा. तेव्हा परीक्षेला हसत हसत सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी नाताळ सुट्टीत अभ्यासाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. तर नवीन वर्षाचे स्वागत घरगुती करावे. मित्रांबरोबर समुद्रकाठी किंवा सार्वजनिक ठिकाणी जावून शक्यतो करू नये. यात अधिक वेळ जातो. त्याचप्रमाणे बाहेरचे खाल्ल्याने तब्बेत बिघडण्याची शक्यता असते. वार्षिक परीक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी नवीन वर्षाच्या स्वागतापासून दूर राहिले पाहिजे. तसेच बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे इतर विद्यार्थ्यांनीसुद्धा सुट्टीत वेळ घालवू नये. विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याचे बघावे.

एकदा गेलेली वेळ परत येत नाही. तेव्हा वेळेचा विचार करून विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. बरेच विद्यार्थी मित्रांबरोबर फिरण्याच्या नादात गप्पागोष्टी करण्यात अधिक वेळ घालविताना दिसतात. तेव्हा अशा सवयींना विद्यार्थीदशेत आळा घातला पाहिजे. मित्रांसोबत गप्पागोष्टी केल्याने मन मोकळे होत असले तरी त्यात जास्त वेळ घालवू नये. असा वेळेचा दुरुपयोग केल्याने अभ्यासाकडे दुर्लक्ष होते. नंतर परीक्षा जवळ आली की मन चलबिचल होते. अभ्यास न झाल्याने आता नेमका कोणत्या विषयाचा अभ्यास करावा, यात विद्यार्थ्यांचा संभ्रम निर्माण होतो. आज या विषयाचा अभ्यास करू की, दुसऱ्या विषयाचा असे प्रश्न मनात निर्माण होत असतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन बिघडण्याची शक्यता असते. यासाठी दररोज अभ्यास महत्त्वाचा असतो. जे विद्यार्थी वेळेचे नियोजन करून नियमित अभ्यास करतात ते आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. साहजिकच अभ्यास केल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढलेला असतो. कोणत्याही प्रकारचा ताणतणाव निर्माण होत नाही. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. वर्षभर जो काही अभ्यास त्यांनी केलेला असेल, तो विद्यार्थ्यांचा परीक्षेतील उत्साह वाढवत असतो.

आता दीपावलीच्या सुट्टीत आपण काय केले? मित्रांबरोबर जुन्या आठवणींना उजाळा दिल्याने दिवस कसे गेले हे समजले नसतील कदाचित? तेव्हा जागे व्हा, अभ्यासाला लागा. अजून वेळ गेलेली नाही. त्यामुळे निराश होण्याचा प्रश्नच येत नाही. आता खरी अभ्यासाची कसोटी आहे. इतर गोष्टी डोक्यातून काढून अभ्यासाकडे लक्ष द्यावे. काही विद्यार्थी अक्षरश: आळशी असतात. आई-वडील सांगतात म्हणून शाळेत जायचे म्हणून जायचे, आता उद्यापासून अभ्यास करूया अशात उद्या उजाडत नाही आणि काही दिवसांवर परीक्षा येते. नंतर काय करावे तेच त्यांना सुचत नाही. त्यात घरच्यांचे बोलणे, त्याला उत्तर काय द्यायचे हा त्यांच्या पुढे पडलेला प्रश्न? अशा अनेक कारणांमुळे काय करावे अशा द्विधा स्थितीत ते असतात.

तेव्हा अशी वेळ परीक्षा कालावधीत येऊ नये म्हणून आतापासून परीक्षा संपेपर्यंत नियमित अभ्यास केला पाहिजे. काही विद्यार्थ्यांचे वडिलोपार्जित घरगुती उद्योगधंदे असल्याने शेवटी कितीही शिकलो तरी आपला धंदा चालवायचा आहे, म्हणून अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे असे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांनासुद्धा आपल्यासारखे करतात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या नादाला लागू नये. यात आपले नुकसान करून घ्याल. तेव्हा असे विद्यार्थी काय करतात यापासून अलिप्त राहिले पाहिजे. त्यांनी शिक्षण घेतले काय, नाही घेतले काय त्याचा त्यांच्यावर काहीच फरक पडत नाही. आपल्याला मात्र शून्यातून विश्व निर्माण करायचे आहे. कारण आपल्यावर अजून अनेकजण अवलंबून आहेत. अशा विद्यार्थ्यांनी आपली जबाबदारी ओळखून अभ्यास करावा.

आता जरी वर्षाचा शेवटचा महिना असला तरी बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला असेल. बऱ्याच प्रमाणात नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अभ्यासक्रम शिकवून पूर्ण केला जातो. त्यानंतर परीक्षा होईपर्यंत प्रत्येक विषयाची उजळणी व सराव परीक्षेवर शिक्षक भर देत असतात. जेणेकरून आपल्या विद्यालयाचा निकाल चांगला लागावा म्हणून प्रयत्न करीत असतात. यात शाळा प्रशासक तसेच शिक्षकवर्ग प्रयत्न करीत असले तरी विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे की, आपणसुद्धा प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे. बऱ्याच प्रमाणात अध्यापकवर्ग जीव तोडून अध्ययन करीत असतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना घेता आला पाहिजे. त्यासाठी परिश्रम जास्त महत्त्वाचे असतात. जो विद्यार्थी मन लावून अभ्यास करण्यासाठी परिश्रम घेतो, त्याला त्याचे निश्चित फळ मिळते. त्यासाठी विशेषत: बोर्डाच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांनी आतापासून जोमाने अभ्यासाला लागले पाहिजे. यातच त्यांचे खरे यश दडून बसले आहे.

# आदरांजली वाहण्या अगोदर वैचारिक व्हा..

बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे देश हिताचे व देशातील प्रत्येक माणवाच्या कल्याणाचे आहे. स्वतः चे लेकरांना मुठमाती देऊन करोडो लोकांच्या जिवनाला आनंदवन बनवणारे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर जगातील एकमेव व्यक्तीमत्व आहे. वर्ण प्रधान व जाती प्रधान देशामध्ये एकाच वर्णाला स्वतः च श्रेष्ठ मानुन इतरांना हीन माणण्याची अमानवीय रुढी परंपरा येथे होती. मानसा माणसात भेद करून माणसातील भेद कायम रहावा व या माणवी भेदामुळे एकाच वर्णाचा आर्थिक, धार्मिक व सामाजिक फायदा व्हावा आणि इतरांना धर्माच्या जातीच्या नावाखाली भावनिक बनवून माणसिक गुलाम बनवण्याचे काम या व्यवस्थेने केले. आणि लोकांना अज्ञानात ठेऊन अंधविश्वास, पाखंड व थोतांडाची निर्मिती करून माणसाच्या डोक्यात भिती निर्माण करून दहशत निर्माण केली. व हजारो वर्षांपासून मानसिक गुलाम बनवून त्यांचे मानसिक, आर्थिक व सामाजिक शोषण केल्या गेले. विषमता, अंधविश्वास, पाखंड, आणि यावर उभी केलीली एका वर्णाची व्यवस्था उलथून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक जाती धर्मातील व्यक्तीला समान स्थान, मान सन्मान, हक्क अधिकार व मानवी स्वातंत्र्य बहाल केले. म्हणून खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील मानवाचे खरे उद्धारक ठरतात. वर्ण व्यवस्थेमधुन निर्माण झालेली जातीव्यवस्था आणि हि जातीची उतरंड रचुन एक जात दुसऱ्या जातीपेक्षा मोठी करण्याचा प्रयत्न करून जातीतील लोकांना हिन लेखणारी संस्कृती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी नष्ट करून सर्वांना एकाच रांगेत समान पातळीवर आणले व जात, धर्म, पंथ, लिंग यानुसार कोणताही भेद केला जाणार नाही वा कोणतीही संधी नाकारली जाणार नाही अशी व्यवस्था निर्माण करून. हजारो वर्षांपासून शिक्षण, मानसिक स्वातंत्र्य व मुलभूत हक्कापासून दुर असलेल्या व्यक्तीला सरळ सत्तेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होऊन स्वतः चे अर्थात जनतेचे सरकार बनवण्याची ताकद दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे करोडो कुळांचा उद्धार झाला हे खरे आहे. पण आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे विचार करोडो घरात नाहीत हि खुप मोठी शोकांतिका आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणारे अर्थात सध्याचे बौद्ध लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी बापाचे नाते लावतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर या नावा बद्दल प्रचंड प्रेम, आपुलकी हि बौद्ध समाजामध्ये आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी वाटेल ते करण्याची हिम्मत ही बौद्ध समाजातील लोक दाखवतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाचा सर्वात जास्त सन्मान कोणी करत असेल तो बौद्ध समाज आहे यामध्ये कुठेही दुमत नाही. समता स्वातंत्र्य बंधुता व सामाजिक न्यायासाठी वैचारिक बौद्ध जाती धर्माचा विचार न करता न्यायाच्या बाजुने उभे राहतात यामध्ये ही शंका घेण्याचे कारण नाही. मराठा ओबीसी च्या वैचारिक जागृती साठी बौद्ध लोक तत्पर असतात हे अनेक उदाहरणावरून दिसून येते. परंतु मराठा ओबिसी ची बहुतांश लोक आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांच्या प्रती एकनिष्ठ नाहीत वा पाहिजे तसे भावनिक नाहीत, डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाला मराठा ओबीसी तसेच बहुजन समाजातील इतर लोक बौद्धांची वैयक्तिक संपती समजात. म्हणून आजही मराठा ओबीसी लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाला आजही समजून घेत नाही ही खंत आहे. परंतु मुळ प्रश्न हा आहे की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी नाते जोडणारे बौद्ध लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने वागतात का? ज्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बापाचा दर्जा दिला जातो त्या बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मराठा ओबीसी लोकांना समजून सांगितले जातात का? मराठा ओबीसी फुले शाहु आंबेडकर या विचार धारेमध्ये येत आहेत नाही असे नाही. परंतु बहुतांश लोक जे आजही आंबेडकरवादी चळवळी पासून दुर आहेत अशा लोकांना चळवळी मध्ये आणण्यासाठी बौद्धांनी काय केले याचीही समिक्षा करणे आवश्यक आहे. कारण केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर लिहून चालणार नाही, यांच्या वर बोलुन चालनार नाही तर आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची बाजु कोणत्या पद्धतीने मांडतो यावरही बरेच काही अवलंबून असते. बऱ्याच वेळा डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाची मांडणी करताना चुकीच्या पद्धतीने केली जाते. ज्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांचे कार्य प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपणच मर्यादित करतो. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करणे म्हणजे केवळ ठराविक दिवस फक्त हार घालणे, ठराविक दिवशी माईक घेऊन बोलणे, ठराविक दिवसाची सुपारी घेऊन पैसे कमवणे, ठराविक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन निव्वळ मनोरंजन करणे, गळ्यात निळा रुमाल वापरणे, घरावर निळा ध्वज फडकवणे म्हणजे अभिवादन मुळीच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना खरे अभिवादन, खरे वंदन तेव्हाच होईल जेव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजात पेरण्याचे काम करू. समाज म्हणजे बौद्ध धम्म नव्हे तर ज्या लोकांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे काम आहे त्यांच्या पर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान पोहचवणे वैचारिक व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी नाते सांगणाऱ्या लोकांचे काम आहे. परंतु मुख्य समस्या हिच आहे की डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी सर्वांसाठी काम केले, त्यांचे कार्य व विचार सांगण्या अगोदर आपण जे बोलतो. त्यावरून च बाकीचे लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान ऐकत नाहीत. जे लोक ऐकायला तयार नाहीत ते वाचणार कधी हा संशोधनाचा विषय आहे. बोलायला सुरवात करतो तेव्हा आपण बोलतो. दलीतांचे उद्धारक, आमच्या बापाने आमच्या साठी संविधान लिहले, हिंदु धर्माला लाथ मारली व बौद्ध धम्माची दिक्षा देऊन आम्हाला शांती व समता दिली, असे बोलुन जर सुरवात होत असेल तर फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन असते असे बोलले जाते तोच नियम येथे लागु होतो. दलित असंविधानीक शब्द वापरून डॉ बाबासाहेब आंबेडकर नेमके कोणाचे उद्धारक आहेत हे बोलणाऱ्यालाच कळत नाही, आमच्या बापाने आमच्या च साठी लिहले असे बोलल्याने मराठा ओबीसी कशाला ऐकणार? हिंदु धर्माला लाथ मारून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्म स्विकारला तर हिंदू लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर का समजून घ्यावे हा प्रश्न साहाजिकच असतो. थोडक्यात काय तर बोलतानाच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी चुकिच्या पद्धतीने



केली जाते. महिलांचे उद्धारक, शेतकऱ्यांचे कैवारी, ओबिसी चे जनक, राष्ट्रनिर्माते, प्रत्येकाला मानसन्मान मिळवून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर अशा पद्धतीने जे सर्व सर्वसमावेशक काम होते तसे बोलायला सुरवात केली तरच लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर ऐकण्याची उत्सुकता लागेल, ऐकता ऐकता वाचायला व वाचता वाचता समजून घ्यायला लागतील. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर बोलताना लिहताना सत्य व सर्व समावेशक बोलावे लिहावे. सर्व समावेशक याचा अर्थ इतरांना चांगले वाटावे म्हणून सत्य लपवून ठेवणे मुळीच नाही. सत्य च बोला परंतु बौद्ध आणि असंविधानीक शब्द दलित यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अडकून ठेऊ नका. वा डॉ बाबासाहेब आंबेडकर मांडताना धर्म विरोधी मांडू नका. डॉ बाबासाहेब आंबेडकर धर्माच्या विरोधात नसुन ते धर्मातील अंधविश्वास, थोतांड, पाखंड, विषमता, अस्पृश्यता, अज्ञान, भोंदुगीरी अशा अमानवीय प्रथेविरोधात होते. हे ही समजून घेणे आवश्यक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन, अभिवादन करणे म्हणजे केवळ सहा डिसेंबर ला मुंबई, अशोक विजया दशमी ला नागपूर, भिम जयंती ला मिरवणुकीत, नामविस्तार दिनाला औरंगाबाद ला जाने व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर देखाव्या साठी नतमस्तक होणे असे मुळीच नव्हे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना खरे वंदन आणि अभिवादन तेव्हाच होते जेव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून त्यांच्या शिकवणुकी नुसार वागतो. आज आम्हाला समीक्षा करणे आवश्यक आहे. लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून सांगण्यापेक्षा, इतर लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना का मानत नाहीत हा प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा आम्ही थेट डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शी नाते जोडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बाप मानतो. मग जर आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बाप मानतो तर बापाचे विचार स्विकारून आपण जिवन जगणे आवश्यक असे. जो बापाचे ऐकत नाही त्याला समाजात किंमत नसते याचीही जाणीव प्रत्येकाला आहे. मग डॉ बाबासाहेब आंबेडकर बाप असतील तर त्यांच्या विचाराने वागणे आमचे काम आहे. आम्ही आमच्या बापाच्या विचाराने वागतो का? याची समिक्षा कधी करायची? आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वैचारीक पातळीवर स्विकारले का यावर विचार विनीमय करणे आवश्यक आहे. समाजा साठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी व रमाई यांनी स्वतः च्या पोटची मुलं गमावली, डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्वात विद्धान होते, त्यांनीच आम्हाला माणसात आणले, आम्ही खातो त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे असे बोलून लोकांना भावनिक बनवून, टाळ्या व पैसे कमवू शकतो. पण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे व कार्याचे काय? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी चार मुल गमावली. पण बाबासाहेब गेल्यानंतर आम्ही समाजासाठी काय केले? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला माणसात आणले पण आज आम्ही माणूस म्हणुन जगतो का? बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला बोलण्याचा, लिहण्याची अधिकार दिला आम्ही सामाजिक वेदनेवर बोलतो का लिहतो का? आमच्या भाकरी वर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची सही आहे पण आम्ही भाकरी ला इमानदार आहोत का? या प्रश्नांची उत्तरे मिळवणे आवश्यक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या शिक्षणाचा व पैशाचा वापर आमच्या साठी च केला, वृत्तपत्र, शैक्षणिक संस्था, सुरू केल्या पण बाबासाहेब गेल्यानंतर आम्ही आमच्या शिक्षणाचा व पैशाचा वापर कशासाठी केला? याचाही हिशोब देणे महत्त्वाचे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर नतमस्तक होण्याआधी आम्हाला नतमस्तक होण्याच्या लायकीचे होणे आवश्यक आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सर्वात महत्त्वाचा संदेश. अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य समस्त मानव जातीला लागु होतात. एका जातीसाठी त्यांचे विचार व कार्य नाहीच परंतु आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेतो म्हणून आपल्याला अगोदर ते काटेकोर पणे पाळणे आवश्यक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश म्हणजे शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा. आज लोक शिकले, परंतु संघटीत झाले नाही आणि वैयक्तिक फायद्यासाठी संघर्ष सुरू केला. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची तोडफोड करून अनेकांनी सामाजिक संघटना व राजकीय पक्षाच्या माध्यमातून स्वतः ची दुकानदारी सुरू केली. स्वतः च स्वतः ला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मिरवून घेण्याची हौस जडली. हजारो राष्ट्रीय नेते तयार झाले पण एकही लोक प्रतिनिधी हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील, किंवा विचारधारेच्या पक्षातील नसेल तरी स्वतः च्या नावापुढे राष्ट्रीय अध्यक्ष लावताना थोडही काही वाटत नसेल तर आपल्या कडे नैतिकता आहे का? बाबासाहेब आंबेडकर यांनी संघटीत व्हायचे सांगितले आम्ही विघटित होऊन स्वतः ची दुकानदारी चालवत बसलो. समाजाचे काय? प्रत्येक जन स्वतः च स्वतः ला नेता समजतो, जनतेने तर नेता समजायला पाहिजे? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन दुकानदारी थाटण्यात नेमका काय मोठेपणा आहे? हजारो नेते तयार झाले तरी हक्काचा प्रतिनिधी नाही. सर्व जन एकत्र आले तर काही तरी हक्काचे उमेदवार निवडून येऊन चळवळीला बळकटी व समस्या सोडवायला मदत होईल. हा साधा विचारही डोक्यात येऊ नये का? बर यांच्या दुकानदारी ची जाहिरात नको त्या ठिकाणी करण्यात यांना मोठेपणा वाटतो. जसे नागपूर, मुंबई, औरंगाबाद अशा ठिकाणी सर्वसामान्य लोक केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे येतात. परंतु अशा ठिकाणी दुकानदार आपल्या दुकानाची जाहिरात करून दुकानदारी चालवण्याचा प्रयत्न करतात. तर कुठे तरी थांबायला पाहिजे जेथे लोक स्वतः हुन केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे एकत्र येतात तेथे तरी यांनी एका मंचावर येऊन सामाजिक कामासाठी आम्ही एकच आहोत असा संदेश द्यायला पाहिजे तर जागोजागी वेगवेगळे दुकाने थाटतात तेव्हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश पायदळी तुडवला जातो हे बघून मनाला त्रास होतो. सामाजिक ठिकाणी राजकीय व वैयक्तिक जाहिरात करणाऱ्यांना खरचं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्याचा अधिकार आहे का? हे जनतेकडून समजून घ्यावे म्हणजे कळेल. आता तरी शुद्धीवर येऊन आपण एकीकरण करावे. हीच आंबेडकरवादी जनतेची मनोमन ईच्छा आहे. दुसरी बाजू म्हणजे जो कर्मचारी, अधिकारी व व्यावसायिक वर्ग आहे त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मोलाचा संदेश दिला तो म्हणजे आपल्या उत्पन्नातील विसावा भाग अर्थात पाच टक्के रक्कम ही समाज हितासाठी खर्च करावी. बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी अस केले तस केले हे सांगण्या अगोदर नोकरदार व व्यावसायिक वर्गाने आपल्या उत्पन्नातील पाच टक्के वाटा हा कुठे खर्च केला याची ही समिक्षा करणे आवश्यक आहे. हा पैसा शिक्षण, आरोग्य रोजगार यावर खर्च होणे आवश्यक असते. परंतु आज पर्यंत कीती नोकरदार, पेशंनर यांनी एकत्र येऊन पाच टक्के रक्कम एकत्र करून शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर खर्च केला? जर हा खर्च झाला असेल तर त्या समुहाचेच खरे अभिवादन असेल. एकट्या बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वृत्तपत्र सुरू केले परंतु बाबासाहेब गेल्यानंतर आम्हाला वृत्तपत्र जगवता आले नाही याचे कारण आम्ही वृत्तपत्र जगवण्यासाठी पुढाकार घेतलाच नाही. जे वृत्तपत्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा व संविधानाचा सतत प्रचार आणि प्रसार करतात अशा वृत्तपत्रांना मदत करणे आवश्यक आहे. जे लेखक, कलाकार कोणतीही मानधनाची अपेक्षा न करता वर्षभर प्रबोधन सुरु ठेवतात त्यांच्या वर खर्च करणे आवश्यक असते. गोरगरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण, आरोग्य व रोजगार निर्मिती साठी पाचटक्के खर्च करणारा व्यक्तीच खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा खरा अनुयायी आहे. आणि त्यांनाच खऱ्या अर्थाने अभिवादन करण्याचा अधिकार आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने निव्वळ दुकानदारी करून, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राजकीय पोळी भाजत्यासाठी बेकी करून वागणाऱ्यांना डॉ बाबाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर नतमस्तक होऊन मी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करूच नये. कारण जनतेच्या अपेक्षा या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार सरणीच्या आहेत तर नेते आणि नोकरदार व व्यावसायिक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेच्या विरोधात वागताना दिसत आहेत. म्हणून जनतेच्या मनात सन्मान आणि आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा खरा अनुयायी होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करायचे असेल तर अगोदर वैचारिक होणे आवश्यक आहे. तरच बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर नतमस्तक होण्याची पात्रता आपल्या अंगी येईल व समाजात बदलाची निर्मिती होईल आणि हिच खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली असेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन..

***************

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन !

आम्ही भारताचे लोक म्हणजे सर्व भारतीय नागरिक एकच आहोत. आमच्यात कोणताच जातीपातीचा वर्ण वर्ग भेद नसून संपूर्ण भारतीयांनी मनातून हमेशा अखंड एकता व समानतेने राहण्यासाठी सर्वांना योग्य समानतेची खरी वागणूक मिळण्याकरिता भारतीय लोकांनी एकत्र येऊन सर्वांचे एक मत तयार होऊन यामध्ये लोकमत सहभागी राहून सर्वांनी आपला मनापासून सहभाग घेऊन सामूहिक वैयक्तिक स्वातंत्र्य व दर्जा संधीची समानता आणि न्याय हक्क अधिकार बंधूत्वाच्या एकात्मतेची शिकवण कबूल करून आपले भारतीय संविधान स्विकारून सर्व मान्य केले गेले आहे. अशी सर्व श्रेष्ठ फार महत्वाची आपली भारतीय राज्य घटना देशाला अर्पण करणा–या महान देशप्रेमी, महानायक, महामानव भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ६डिसेंबर दिनी अभिवादन ! १५ ऑगस्ट १९४७ ला इंग्रजाच्या गुलामी मधून भारत स्वतंत्र झाला होता व भारताला स्वातंत्र्य भेटले होते आणि २६ नोव्हेंबर १९४९रोजी संविधान सभेत पुर्ण सहमती दर्शवून सर्व मत मंजूरीने भारताचे संवधिान लागू केले गेले आहे २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधानाच्या सार्वजनिक लोकशाहीच्या अंमलबजावणीची खरी जबाबदारी भारतीयांना दिलेली आहे. परंतु २६ जानेवारीला आम्ही फक्त प्रजासताक दिवशी एकत्रित येतोत आणि हा गणतंत्र दिवस केवळ राष्ट्रीय सन म्हणून साजरा केला जातो. दर वर्षी झेंडा वंदन आगोदर भारतीय संविधानाची प्रस्थाविका वाचन करून भारतीय ध्वजाला सलामी करून लोकशाही उत्सव साजरा केला जातो. पण त्यावर काहीच बोलले जात नसून सर्वत्र समूहाची चर्चा संवाद विचार मंथन करायला दुर्लक्ष केले जात आहे म्हणून देशात भारतीय संविधान कायदा लागू व सुरू असतानापण आज स्वातंत्र्य मिळायला ७५ वर्ष पुर्ण होत असताना सुद्धा मूलभूत भारतीय कायदा राबविला जात नसल्याने मनुवादी खाजगी कायदा वापरला जाऊन सर्वांना आपल्या हक्क अधिकाराला वंचित केले जात आहे. कारण पूर्वीकाळापासून भारतात जाती व्यवस्था कायम राहल्याने मनुवादी ब्राम्हणशाही भांडवलशाही जातीवादी राजकारणी लोकांकडून सर्व समाजात असमात विषमता पसरवून एकमेकात भेदभावाची भावना निर्माण केल्याने कायदा नियमाचे उल्लंघन केले जात आहे. यासाठी अगोदर पासून सर्व सामान्य नागरिकांनी राज्य कारभारात लक्ष न दिल्याने शासकीय कामकाजात राजकीय हस्तकाने आर्थिक सामाजिक दबाव लाभामुळे सर्व क्षेत्रामध्ये जातीभेदाचे राजकारण करणा–या सताधारी आणि विरोधी पक्ष यांचा सामाजिक आर्थिक गैरहस्तक्षेप असून सर्व शासन व्यवस्था मध्ये जातीवादी व्यवस्थाचे राजकारण सुरू असल्यामुळे खाजगी संस्था शासकीय व्यवस्थापणात मनमानी कारभार केला जाऊन सर्व सामान्य नागरिक व बहुजनांवरील अन्याय अत्याचार जास्त प्रमाणात सुरू आहेत. आपल्या देशातील वातावरणात जणावर प्राणी एकत्र येऊन जमा होतात परंतु एकमेकात भेद टाकून एक दुस–या माणसाला एकत्र जमा होऊ न देण्याचे खरे माहिती कारण असे आहे की, पूर्वीकाळा पासून मनुवादी लोकांनी अनैतिक विज्ञान वापले जाऊन साम दाम दंड भेद नीतीचे गुप्तपणे खोटे षडयंत्र रचून वापरून आतापर्यंत सर्व समाजा मध्ये व्यवहारीक नजर ठेवून भेदभाव निर्माण केला गेला आहे म्हणून प्रत्येक समाजाची खूपच गंभीर खराब परिस्थिती झाल्याने याला सद्या अस्तित्वात असणारी मनुवादी जातीयवादी व्यवस्था जबाबदार व कारणीभूत आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व साधारण नागरिक व बहुजनाला धोकादायक इशारा देऊन सावधान हुशार व जागृत केले गेले आहे. संविधान कितीही चांगले असो ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे तर जर अप्रमाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही.तसेच संविधान कितीही ही वाईट असो,ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर प्रमाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. सर्व बहुजन बौद्ध उपासक उपासिका व कार्यकर्ते यांनी दर रविवारी बुद्ध विहारात एकत्र वंदना घेऊन सर्वांनी पंचशील बावीस प्रतिज्ञा पालन व आचरण करण्याची सवय आदत लावून घेऊन सर्वांनी नियमित धम्म चर्चा करायला वैयक्तिक सामूहिक बुद्ध विहाराला जायला महापरिणिर्वान दिना निमिताने आज आपण असा संकल्प करू या. दै. सम्राट वाचक– उपासक– रमेश कांबळे रा. परतूर जि.जालना. मो.नं. ८८०५५८२४८० जय सम्राट !

# जगातील एक महान व्यक्ती - डॉ. आंबेडकर

१९१३ मध्ये रामजी लष्करी सेवेतून निवृत्त झाले. त्यानंतर ते दापोलीस आले. भिमराव तेथील शाळेत जाऊ लागला. पण मुळात भिमाचा स्वभाव खोडकर असल्यामुळे त्यांची भांडणे मिटवणे दिवसेंदिवस रामजीला जड जाऊ लागले. त्यामुळे ते साताऱ्यास राहावयास आले. त्याचा खोडकर स्वभाव जावा म्हणून त्याचे नाव कॅम्प हायस्कुल मध्ये दाखल केले. साताऱ्याचे वास्तव्य भीमाबाईला लाभदायक नव्हते. त्यामुळे त्यांची तब्येत वारंवार बिघडून जात असे. अशातच त्यांनी कायमचे अंथरुण-धरले आणि त्या मृत्यू पावल्या. त्यावेळी भिमराव अवघे सहा वर्षाचे होते. भीमाच्या शिक्षणासाठी रामजींनी अतोनात कष्ट घेण्याचे ठरविले होते. आपल्या मुलाला प्रखर बुध्दीमत्तेची दैवी देणगी लाभली असल्याचे ओळखून भीमाच्या हिंदु समाजातील एका अडाणी व क्रुर रुढीमुळे त्याकाळी अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या जातीत जन्मल्यामुळे काही जणांकडुन क्षणोक्षणी अपमान होऊ लागला. पण त्यातही त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या केळुसकर गुरुजींच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे भिम उत्तम तऱ्हेने मॅट्रीकची परीक्षा १९०७ साली पास झाला, चाळीतील लोकांनी मोठा थाटात सत्कार केला. रामजी पुढे मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईस आले. भीमाने मुंबई सारख्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश केला. जातीने अस्पृश्य असल्याने भिमाला इच्छा असूनही संस्कृतचा अभ्यास करता आला नाही. पार्शियन भाषेत मात्र त्याचा पहिला नंबर असे. आनंदाची अभ्यासातील प्रगती बेताचीच असल्याने त्यास नोकरीला लावले, नंतर आनंद व भीमाचे लग्न केले. लग्नाच्या वेळी भीमा १४ वर्षाचा रमा ९ वर्षाची होती.बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचेकडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडिल आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला. बडोद्याच्या प्रागतिक राजे सयाजीराव साहेबांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. त्यानंतर त्यांनी निरनिराळया विषयांवर दोन-तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी दिली. सरकारी कचेरीत त्यांना मोठया हुद्याची जागा देण्याऐवजी केवळ २२५ रुपयांवर खर्डेघाशी करावी लागू लागली. हाताखालचे लोक देखील त्यांना पाणी देत नसत व त्यांच्या टेबलावर दुरुन फाईल टाकत. मानी भीमरावांना मिळत असलेली ही वागणूक पसंत नव्हती. त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला म्हणून ते मुंबईला परतले.एवढे झाले तरीही त्यांनी धीर खचू दिला नाही, थोडीशी खटपट करुन त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली, पैसा जमवला व १९२० साली ते अपुर्ण अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळया ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे, त्याचे फळ १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी होय. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमही विधायक आणि व्यापक भूमीका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वत:हुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली. त्यापैकी पहिली सुरुवात म्हणजे १९४० साली त्यांनी सुरु केलेले पाक्षिक मुकनायक हे होय.त्यानंतर त्यांनी महाडच्या तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले, प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवन म्हणजे भारतीय जनतेच्या समतेच्या लढयाची अविस्मररणीय गाथा होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जिवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगीतला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.



नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. त्या दरम्यान बहिष्कृत भारत नावाचे नियतकालिक सुरु केले. आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. त्यात बॅरी. तेजपाल सप्रु, बॅरी. जयकर आणि बॅरि. आंबेडकर हे होते. परंतु उर्वरित दोन तज्ञांनी नकार दिल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरुंनी ही जबाबदारी बॅरी. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली. एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू भारतीय हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेला कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मीक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना, कायदामंत्री असतांना रिपब्लीकन पक्ष काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले पाहिजे. खरोखरच डॉ. आंबेडकरांना वगळून हा देश मोठा झाला असता काय ? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकरांची कायदामंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी अहोरात्र कष्ट करुन मोठया कष्टाने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. त्यामुळे त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे, तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही. दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे. म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र-शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ सालची पहाट, अतिशय मंगल पहाट होती ती, सुर्यचंद्र इत्यादी ग्रहांचा पवित्र मिलाप झाल्याचा तो दिवस होता. शिवाय तो दिवस भाग्याचा व पुण्यांचा समजला गेला होता. त्याचवेळी भिमाबाईला मध्य भारतातील महू या ठिकाणी पुत्ररत्न लाभले. बाराव्या दिवशी मुलाचे 'भीमराव'असे नाव ठेवण्यात आले. त्यांचा हिंदु धर्मातील पाखंडी संताना विरोध होता. भारत देशावर मात्र त्यांचे अलोट प्रेम होते. त्यामुळे हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु. कारण या धर्माचे लोन जागतीक पातळीवर उंचावत आहे.

आयुष्यभर अनेक गोष्टींशी त्यांना झगडा करावा लागला. अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. पैशांची अडचण असताना त्यातून मार्ग शोधावे लागले. त्यासाठी त्यांनी अतोनात कष्ट सोसले, उन्हातान्हाची पर्वा केली नाही. साहजिकच त्यांची प्रकृती खालवली रक्तदाब, मधुमेह, या सारख्या रोगाने त्यांना पछाडले आणि शेवटी ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. देशाच्या भारतरत्न हा सर्वोच्य पुरस्कार भारत सरकारने त्यांना मरणोपरांत बहाल केला अशा या थोर महापुरुषाच्या ६७ व्या महापरिनिर्वाणदिनी पुण्यस्मरण !

****************

**प्रविण बागडे**

नागपूर भ्रमणध्वनी - ९९२३६२०९१९

# महापरीनिर्वाण दिनाची जत्रा नको,पुण्यानुमोदन हवे!.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्याने विशेष लेख

पुण्यानुमोदन म्हणजे काय?.मृत व्यक्तीने केलेल्या कार्याला अनुमोदन देणे म्हणजेपुण्यानुमोदन होय. मृत व्यक्तीचे कुशल कार्य आठवणे, नातेवाईकांनी कुशल कार्याला अनुमोदन देऊन ते कार्यरत ठेवण्याचा संकल्प करणे म्हणजेचपुण्यानुमोदन होय.विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनाची जत्रा दरवषी मुंबईत दादरला भरते असे इतर समाजाचे लोक आपसात चर्चा करतांना दिसतात.१७ नोव्हेंबर ला एका मराठी हिंदू हृदय सम्राट यांचा स्मृतिदिन होता.तेव्हा त्यावर मी दोन लेख लिहले होते.ते जवळ जवळ साठ वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले.अनेकांनी उलट सुलट प्रतिक्रिया दिल्या. विशेष आंबेडकरी चळवळीतील विद्वान लोकांनी आणि बौद्धाचार्य यांनी नको त्या शब्दात प्रतिक्रिया दिल्या. त्याची काय लायकी होती तुम्हाला माहिती नाही.काय गरज होती लिहायची.मी म्हटले मी स्तंभ लेखक आहे मला लिहायला विषय दिला तर मी लिहण्यास असमर्थ ठरलो तर साहित्यिक स्तंभ लेखक म्हणून घेता येणार नाही.मला जे वाटले ते मी लिहले तुम्हाला त्यातील काय चुकीचे वाटले ते सांगा. मृत व्यक्तीचे कुशल कार्य आठवणे,कुशल कार्याला अनुमोदन देऊन ते कार्यरत ठेवण्याचा संकल्प करणे म्हणजेचपुण्यानुमोदन म्हणतात.मी त्यांच्या बदल मराठा ओबीसी शिवसैनिकात काय भावना होती ती मी शब्दात मांडली आहे.ते हिंदू हृद्य सम्राटाच्या मृत्यू नंतर ६ डिसेंबर विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनाच्या गर्दीचा रिकार्ड तोडणार होते.पण ११ वर्षातच त्यांचा स्मृतिदिन कधी आला आणि गेला हे मुंबई महाराष्ट्राच्या सोडा दादरच्या लोकांना ही समजत नाही.यांचे कारण का हे आजच्या युवा पिढीला समजले पाहिजे की नाही.म्हणून मी त्यावर लिहले.त्यात माझे काय चुकले?. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर २०२३ ला ६७ वर्ष पूर्ण होत असताना. जिवंत पाणी त्यांच्या क्रांतिकारी विचारांची भिती मनुवादी सनातनी हिंदूंना वाटत नव्हती, त्याही पेक्षा जास्त भीती आज त्यांच्या विचारांच्या लोकांकडून मनुवाद्याना वाटत आहे.तरी हा मागासवर्गीय समाज पूर्ण पणे आंबेडकरी विचार स्विकारत नाही.कुशल कार्याला अनुमोदन देऊन ते कार्यरत ठेवण्याचा संकल्प करणे म्हणजेचपुण्यानुमोदन होय.हा संकल्प सामाजीक,शैक्षणिक सांस्कृतिक,धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात एकजुटीने घेतांना कोणी दिसत नाही.गटागटाने सर्वच स्वताला वारसदार समजतात आणि संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष समजून कार्यक्रम राबवितात.म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या क्रांतिकारी घोषणा,प्रतिज्ञा म्हणजेच त्यांनी दिलेला कोणता ही मंत्र आज समाजात पूर्णपणे रुजला नसल्याचे स्पष्ट चित्र दिसत असतांना ही भिती कायम आहे. त्यामुळे आम्ही बाबासाहेबांना मानणारे लोक खूप पुढे गेलो असे म्हणता येत नाही.आणि खूप मागे ही राहलो असे म्हणता येत नाही. म्हणूनच ६७ वर्षा नंतर ही खरी श्रद्धांजली आदरांजली अर्पण करणारा भिमसैनिक,भिम अनुयायी शिष्य दिसत नाही.तर जत्रेतील हवसे,गवसे,नवसे मोठ्या प्रमाणात दिसतात.ते कशा साठी येतात हे तपासून पहिले तर हाती काहीच लागत नाही. त्यांचे आत्मचिंतन परीक्षण निपक्षपाती करणारे असे विचारवंत,साहित्यिक सत्य शोधन करणारे लेखक निर्भीडपणे आणि निडरपणे लिहणारे पुढे येत नाही. कुशल कार्याला अनुमोदन देऊन ते कार्यरत ठेवण्याचा संकल्प करणे म्हणजेचपुण्यानुमोदन होय.मी दरवर्षी त्या प्रमाणे लिहण्याचा प्रयत्न करत असतो.

बाबासाहेबाचा पुतळा,चबुतरा असलेल्या चौकात निळी दही हंडी आणि बुद्ध विहारा समोर गणपती, नवरात्र उत्सव आता उघडपणे मोठ्या उत्सवात साजरा होते. मातृसंस्थाचे प्रशिक्षक उपासक उपासिका हताश पणे त्याकडे पाहतात.स्थानिक सामाजिक,राजकीय कार्यकर्ते त्यांना रोखण्यास असमर्थ ठरत आहेत.त्यामुळे आम्ही बुद्ध आणि त्याचा धम्म हा बाबासाहेबांनी लिहलेला महान ग्रंथ घराघरात वाचूनही त्याचे आचरण मात्र कुठे होताना दिसत नाही.त्यामुळे संपूर्ण समाज व चळवळ दिशा हीन झाली आहे.कोणाचे कोणाला दडपण भिती राहिली नाही.त्यामुळेच महापरीनिर्वाण दिनाची जत्रा नको,पुण्यानुमोदन हवे.असे मी जाहीर आवाहन करणारे लिहतो. डॉ.बाबासाहेबांनी जीवन भर जो संघर्ष केला.आणि त्यांनी आपल्याला जो जो महत्वाचा संदेश दिला त्यातून आपण काय घेतले हे कोणीच सांगत नाही.बाबासाहेबांनी कोणते असे क्षेत्र सोडले नाही,ज्यात त्यांनी आपला ठसा कायमस्वरूपी कोरून ठेवला आहे.त्यांना मानणारे अनुयायी आपसात शत्रू बनून गटबाजी करून भांडत राहतात.त्यामुळेच कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होतांना दिसत नाही. एका बाजूला आम्ही मनुवाद्यांना शत्रू म्हणून लांब ठेवणार कि मित्र म्हणून जवळ करणार?. त्यांच्या आर्थिक मदतीवर किंवा सामाजिक सलोख्यावर आम्ही राजकीय लढाई कशी लढणार?. मोठे नेते कार्यकर्ते,पत्रकार,विचारवंत साहित्यिक योग्य मदत सहकार्य घेऊन सुरक्षित नोकरी करून,प्लॉट,टॉवर,बांगला असा सुरक्षित ठिकाणी राहतील,पण खेडया पडयातील व शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या समाजाचे काय?. यांनी बाबासाहेबांचे प्रामाणिक शिष्य किंवा भक्त म्हणून शासन कर्ती जमात बन्या करीता मतदार म्हणून कोणाला मतदान करावे?. हा प्रश्न कायम निकालात निघाला पाहिजे.आपल्या समाजातील शत्रू पक्षात असलेल्या मित्राला कि मित्र पक्षातील शत्रूला?. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरीनिर्वाण दिना निमित्याने लाखोच्या संख्येने जत्रेत येणार कि त्यांच्या क्रांतिकारी विचारांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणार?. त्यांच्या कुशल कार्याला अनुमोदन देऊन पुण्यानुमोदन करणार की एक ना धड भारा भर चिंद्या करणाऱ्या गट बाजांना पाठिंबा देत राहणार?.आपले स्वताचे मुख्य उद्दिष्ट कोणते?. त्यांचे आणि आपले राजकीय उद्दिष्ट कोणते?. हे जाहीरपणे विचारणार आहोत कि नाही?. यांचा विचार कोण आणि कधी करणार?.शत्रू आठ नऊ वर्षात राज्यातील केंद्रातील राजकीय सत्ता हातात घेऊन संविधानाने दिलेले सर्व मूलभूत अधिकार नष्ट करीत असतांना आम्ही फक्त एक दिवसाचे शक्ती प्रदर्शन करून पुन्हा पुन्हा गटबाजीत गुंग राहणार आहोत काय ?. आजच्या परिस्थितीत आंबेडकरी विचारांच्या पक्षाला सुवर्ण संधी देऊन त्यांनी मोठ्या प्रमाणात असलेल्या सर्व मागासवर्गीय समाजाला विश्वास देऊन राजकिय सत्ता घेण्यासाठी सज्ज झाले पाहिजे,आमच्या पक्षाचे उमेदवार निवडून आले नाही तरी त्यांनी घेतलेली मत ही सत्तधारी पक्षाला विरोधी पक्षाच्या या मतदान घेणाऱ्या उमेदवार आणि पक्षाची कायमस्वरूपी भीती राहिली पाहिजे.हे समाजाच्या एकजुठी तून दाखवता येईल.म्हणूनच लिहतो महापरीनिर्वाण दिनाची जत्रा नको,पुण्यानुमोदन हवे!.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरानीं असंघटीत अशिक्षित शोषित अस्पुष्य समाजाच्या यातना आणि वेदना स्वता भोगल्या.आपण उच्च विद्याविभूषित झाल्या नंतर ही चातुर्वण्य मानणाऱ्या चौकटीच्या समाज व्यवस्थेत आपल्याला माणूस म्हणून माणुसकीची व समानतेची वागणूक मिळत नाही.तर माझ्या गोरगरीब असंघटीत असुशिक्षित शोषित समाजाची काय अवस्था असेल?.या चिंतेने ते सतत तळमळत होते.यामुळेच त्यांच्यातील विचारवंताने या समाजाच्या गुलामीच्या बेड्या तोडण्याचे व्रत हातात घेऊन क्रांतीची मशाल पेटविण्यासाठी जीवनभर संघर्ष केला आणि समाजाचे प्रबोधन करून समाज संघटीत केला. इंग्लंड,कोलंबिया सारख्या साता समुद्राच्या पलीकडे परदेशात उच्च विद्याविभूषित होऊन कायदे पंडित झालेला हा विद्वान समाजाच्या न्याय,हक्क,व प्रतिष्ठे साठी रस्तावर उतरून सतत संघर्ष करीत राहिला. आणि त्याच्या संघर्षाला कायद्याचा सनदशीर मार्गाचा आधार होता. त्यांनी वैचारिक अधिष्ठान असलेला युक्तिवाद,संघटना,व राजकीय दबाव याचा समाजा करिता एक हत्यार म्हणून वापर केला.पण त्यांनी कधी ही बेकायदेशीर कारवाया अथवा हिंसाचाराचा कधी अंगीकार केला नाही. कारण बळाचा वापर न करता त्यांनी बुद्धिचातुर्य वापरून सामाजिक क्रांतीचे ध्येय गाठले.आजचे नेते एका आमदार,खासदारकी साठी समाजाला वैचारिक शत्रूशी युती आघाडी करतात. भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांचे संविधान आमच्या समाजाच्या संस्था,संघटनांना का लागू होत नाही.एक घटना,एक नियम,एक नेता,एक झेंडा का लागू होत नाही.ज्यांचे ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद निवडून येण्याची औकात नाही तो संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मिरवतो त्यांना प्रथम धडा शिकविला पाहिजे.समाजात ते होत नसल्यामुळेच चमचे,दलाल, अडते कंत्राटी नेते निर्माण होत आहेत.म्हणूनच महापरीनिर्वाण दिनाची जत्रा



नको,पुण्यानुमोदन हवे!.

त्याकाळी हिंदू धर्माच्या चातुर्वण्य व्यवस्थेमुळे मागासवर्गीय शोषित समाज मानसिक दृष्ट्या पंगु बनला होता.उच्चवर्णीयनी देव,धर्म व धर्मशास्त्राच्या जोखंडत त्याला भोला भक्त (अंधश्रद्धा) बनवून माणुसकी शून्य पशुपेक्षा ही हीन-दिन अस गुलामीच जीवन जगणे भाग पडल्या जात होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी हिंदू धर्मात सुधारणा करण्याच्या जिवापार प्रयत्न केला.पण बदल होत हे लक्षात आल्यामुळे त्यांनी मनुस्मृती जाळली, महाडच्या चवदार तळ्याचा संघर्ष म्हणजे पाण्याला आग लावली,नाशिक काळाराम मंदिर प्रवेश म्हणजे देवाला त्याच्या भक्ताला सुबुद्धी देण्याचे जाहीर आव्हान केले होते.चातुर्वण्य समाज व्यवसस्थेवर घणाघाती घाव घातले होते,पण जेव्हा काहीच हाती लागत नाही हे लक्ष्यात आले तेव्हा बाबासाहेबांनी १९३५ ला येवले येथे धर्मातराची घोषण आणि प्रतिज्ञा केली.पिढीत शोषित समाजाला स्वाभिमान व माणुसकी मिळवून देऊन त्याच्यात क्रांतिकारी बदल घडवून नवसमाज निर्माण करून दाखविला.आणि आज खरेच मागासवर्गीय शोषित समाजात जास्तीचाच बद्दल झाला. त्याकाळी त्याला सर्वधर्मसमभाव चा अर्थ समजत नव्हता त्यावेळी त्याची बुद्धी शेण खात होती.आज सर्व आंबेडकरी समाज वस्त्यातील बाल्लेकील्यात शेणखत काढून पोट भरणारयाची पोर खेड्यातून शहरात आले आणि स्वभिमानी झाली.विविध पक्षाच्या सेल आणि होलसेलचे कार्यकर्ते म्हणून ओळखल्या जातात.त्याचे ऐतिहासिक काम हेच कि बाबासाहेबाच्या सर्व संस्था,संघटना,पक्षात फुट पडून वाटोळे करणे.

माणसाच्या जीवनात धर्माची गरज आहे.माणसाचे मन सुसंस्कृत होण्याकरिता त्याला धर्माची आवश्यकता असते.यावर बाबासाहेबाची श्रद्धा होती.ते स्वत: अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते.म्हणून त्यांना धर्माची आवश्यकता वाटत होती.त्यामुळेच त्यांनी सर्व धर्माचा मनलावून अभ्यास केला.नुसते वाचले नाही.(जसे आज आम्ही बुद्ध आणि त्याचा धम्म वाचतो.) त्यानंतर त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला म्हणजे हिंदुच्या विजया दशमीला धर्मातर करून देशात नव्हे तर जगात रक्ताचा एक थेंब न सांडता सामाजिक धार्मिक क्रांती केली.आणि १९३५ ला केलेली प्रतिज्ञा पूर्ण केली.धर्म आणि धम्म यातील ठळक फरक या देशातील चातुर्वण्य समाज व्यवस्था मानणाऱ्या ढोगी लोकांना दाखवून दिला.धर्म म्हणजे निव्वळ वर्तुनुकीचे व सामाजिक आचरणाचे नियम नव्हे तर नितीमता हे धर्माचे अधिष्ठान असले पाहिजे.धर्माने दारिद्र्याचे गोडवे गाऊ नव्हे.ईश्वराने काही लोकांना केवळ दारिद्र्यात व सर्व प्रकारच्या सुखसोई पासून वंचित राहण्यासाठी जन्माला घातले या उलट इतरांना केवळ गर्भश्रीमंतीत लोळुन आणि विशेषाधिकार वापरून गरिबांवर अधिराज्य गाजविण्यासाठी जन्मा घातले आणि घडविले अशी शिकवण कोणत्याही धर्माने देऊ नये. तर इतरांशी ते आपले बंधू आणि भगिनी आहेत असे समजून वागण्यासाठी श्रध्दा भिन्नभिन असल्या तरी प्रत्येकांने एकमेकाशी केवळ एक मनुष्य मात्र म्हणून वागावे.या साठी धर्माने आपल्या भक्तांना अनुयायांना उतेजन दिले पाहिजे जे धर्म माणसाला माणसा सारखे वागविण्याची शिकवण देत नाही तो कसला धर्म ?.या सर्व कसोट्यांवर परिपूर्ण उतरेलेला जगातील एकमेव धर्म म्हणजे बुद्ध धर्म (धम्म) आहे. याची पूर्ण खात्री बाबासाहेबांना झाली म्हणून त्यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला,आता त्याचे नांव घेणारे अनुयायी त्या त्यागाला परिश्रमाला राजकीय फायद्या करिता सर्वधर्मसमभाव ची फोडणी देण्याचा केविलवाना प्रत्यन करीत आहेत.

बुद्धाचा धम्म मानवतावादी,विज्ञानवादी असून तो याच जीवनात प्रत्यक्ष अनुभव घेण्यावर व आचरणावर भर देणारा आहे.मैत्री,करुणा व शांततेवर जोर देतो.जीवना विषयीचे स्पष्ट आणि रास्त स्पष्टीकरण देऊन सुरवात आणि शेवटही मनुष्यमात्राच्या कल्याणाचाच विचार करतो. शिल,सदाचाराची शिकवण देतो.या धर्मात धम्मात ईश्वराला,काल्पनिकतेला, कर्मकांड,व थोतांडाला अजिबात थारा नसून तो वास्तववादी व परिवर्तनशील आहे.त्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी बुद्ध धम्माची दिक्षा घेतली. त्याचे महत्व चळवळ आणि समाज यात कमी दिसते सर्वच राजकीयदृष्ट्या सर्वधर्मसमभाव चा मागे जाताना दिसतात. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आणि समाजातील बंधुभाव संपला आहे हे सिद्ध होतांना दिसत आहे.याचा गांभीर्याने ६७ व्या महापरीनिर्वाणदिनी विचार झाला पाहिजे. म्हणूनच महापरीनिर्वाण दिनाची जत्रा नको,पुण्यानुमोदन हवे!. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांना व प्रतिमेला कोटी कोटी प्रणाम.

जयभिम!. जयभारत !!.

----------------------

**आयु.सागर रामभाऊ तायडे.**

९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.

# दिव्यांग बांधवांसाठी 'इको सिस्टीम' राबविण्याचा मानस- मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर



लातूर, दि. ०४ (जिमाका) : दिव्यांग बांधवांसाठी सर्वसमावेशक धोरण तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती करून 'इको सिस्टीम' तयार करण्याचा मानस आहे. यासाठी संवेदना प्रकल्प व समाज कल्याण विभागाने पुढाकार घेऊन दिव्यांगांना सशक्त बनवावे, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर आज येथे म्हणाले. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त केंद्र शासनाच्या बौद्धिक दिव्यांग अधिकारीता मंत्रालयाच्यावतीने हरंगुळ येथील संवेदना प्रकल्प येथे आयोजित शीघ्र हस्तक्षेप, पुनर्वसन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

संवेदना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य सुरेश पाटील, कार्यशाळेचे मार्गदर्शक डॉ. रविप्रकाश सिंग यांची यावेळी उपस्थिती होती.

दिव्यांग बांधवांना सर्व सेवा–सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून अडथळा विरहित वातावरणात त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यावरही भर देण्यात येत आहे. दिव्यांगाच्या सक्षमीकरणासाठी लातूरमधील अनेक प्रकल्प राज्याला दिशादर्शक ठरले आहेत. भविष्यातही संवेदनाच्या माध्यमातून निवासी व व्होकेशनल शिक्षण सुरू होत असून हे पहिले केंद्र ठरेल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सागर यांनी सांगितले.

प्रास्ताविक डॉ. योगेश निटूरकर यांनी केले. सूत्रसंचालन सिंधू इंगळे यांनी तर आभार व्यंकट लामजने यांनी मानले. या कार्यशाळेस आशा वर्कर, विशेष शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व स्पीच थेरपिस्ट अशा एकूण २६५ जणांनी सहभाग नोंदविला. यावेळी बौद्धिक दिव्यांगांना शैक्षणिक साहित्याचे किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाज कल्याण विभागाचे राजू गायकवाड, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे बस्वराज पैके यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमापूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिव्यांगासाठी बांधण्यात आलेल्या नूतन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी विविध शाखांना भेटी देत समाधान व्यक्त केले.

दिव्यांग बांधवांना वैश्विक कार्डचे वाटप

लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालयात झालेल्या दोन दिवसीय शिबिरात मंगळवारी दुपारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिव्यांगांना वैश्विक (युडीआयडी) कार्डचे वाटप केले. यावेळी शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांच्यासह महाविद्यालयातील डॉक्टरांची उपस्थिती होती.

# बार्टीकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वानदिनानिमित्ये स्पर्धा परीक्षा घेण्यात आली.



वसमत:: डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी च्या वतीने, २६ नोव्हेंबर २०२३ चे ६ डिसेंबर २०२३ समता प्रवाह अंतर्गत, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत आळणे मिलिंद, गुरुनाथ गाडेकर यांनी, या परीक्षेचे आयोजन केले.सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले .यावेळी अध्यक्षस्थानी बबन पाईकराव साहेब ,रघुपती सरोदे साहेब ,प्रमुख पाहुण्या मीराताई जमदाडे शितल मोरे होत्या. या परीक्षेसाठी इंजनगाव, कारखाना ,साईनगर ,श्रावस्ती नगर येथील मुलांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मीराताई जमदाडे, शितल मोरे ,पूजा पाईकराव, कांचन कुटे ,बेबीताई मस्के ,उज्वला कोल्हे ,दिपाली शिवभगत आदींनी परिश्रम घेतले.

# चक्रीवादळामुळे 'इंडिया' आघाडीची बैठक रद्द

नवी दिल्ली : मिचॉन्ग चक्रीवादळामुळे इंडिया आघाडीची बुधवारी होणारी दिल्लीतील बैठक रद्द करण्यात आल्याची माहिती काँग्रेसने दिली आहे. सुरुवातीला ममता बॅनर्जी आणि नितीश कुमार या बैठकीला अनुपस्थितीत राहणार नसल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर तामिळनाडू चे स्टॅलिनही गैरहजर राहणार आहेत. त्यामुळे ही बैठक रद्द करण्यात आली असून ती १८ किंवा १९ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे.पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीची रणनीती तयार करण्यासाठी ६ डिसेंबर रोजी नवी दिल्लीत इंडिया अलायन्सची बैठक होणार होती. काँग्रेसने ही बैठक बोलावली असून त्यात विरोधी पक्षांचे बडे नेते सहभागी होणार होते. मात्र आता अनेक नेते उपस्थित न राहिल्याने ही बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. वास्तविक, पाच राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला झाला. तेलंगणा हे एकमेव राज्य आहे जिथे काँग्रेसला सरकार स्थापन करण्यात यश आले आहे. याशिवाय राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या हिंदी बेल्ट असलेल्या राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव स्वीकारावा लागला आहे.या निवडणुकीत इंडिया आघातील घटक पक्षांना काँग्रेसने विश्वासात घेतले नसल्याच्या तक्रारी केल्या जात आहेत. त्यामुळेच नितीश कुमार, अखिलेश यादव आणि ममता बॅनर्जी नाराज आहेत. तसेच आता तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनीही या बैठकीला उपस्थित राहू शकणार नसल्याचे कळवले आहे. मिचॉन्ग चक्रीवादळामुळे आपण या बैठकीला उपस्थित राहू शकणार नाही असे स्टॅलिन यांनी कळवल्याचे काँग्रेसने सांगितले. त्यामुळे इंडिया आघाडीची बैठक रद्द करण्यात आली आहे.




# राजपूत करणी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गोगामेडी यांची गोळ्या झाडून हत्या

जयपूर : राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखदेव सिंह गोगामेडी यांची मंगळवारी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. जयपूर पोलीस आयुक्तांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात दोन जण जखमीही झाले आहेत. सुखदेव सिंह गोगामेडी यांच्यावर श्यामनगर परिसरात त्यांच्या घरामध्ये घुसून गोळीबार करण्यात आला. त्यानंतर त्यांना जखमी अवस्थेमध्ये रुग्णालयात नेण्यात आले. सुखदेव सिंह यांच्यावर गोळीबार झाल्याची माहिती मिळताच संपूर्ण प्रशासनामध्ये खळबळ उडाली. स्थानिक पोलिसांबरोबरच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.दरम्यान, गोळीबार करण्यासाठी आलेल्या एका हल्लेखोराचाही मृत्यू झाला आहे. सुखदेव सिंह गोगामेडी यांना गोळी कुठे लागली याबाबतची माहिती समोर येऊ शकलेली नाही. मात्र हा गोळीबार श्यामनगरजवळच्या त्यांच्या निवासस्थानाजवळ झाल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेनंतर मेट्रो मास रुग्णालयाजवळ मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. तसेच परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. सुखदेव सिंह यांना दोन गोळ्या मारण्यात आल्या आहेत. मात्र हा गोळीबार कुणी केला, याबाबतची माहिती समोर आलेली नाही.सुखदेव सिंह गोगामेडी दीर्घकाळापासून राष्ट्रीय करणी सेनेशी संबंधित आहेत. त्यांनी करणी सेनेच्या संघटनेत झालेल्या वादानंतर राष्ट्रीय राजपूत करणी सेना या नावाने वेगळी संघटना स्थापन केली होती. गोगामेडी हे तिचे अध्यक्ष आहेत. ते पद्मावत चित्रपट आणि गँगस्टर आनंदपाल एन्काऊंटर केसनंतर राजस्थानात झालेल्या आंदोलनामुळे चर्चेत आले होते.



## ग्रामपंचायत निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना ६ डिसेंबरपर्यंत पारंपारिक पद्धतीने निवडणूक खर्च सादर करता येणार

लातूर, दि. ०५ (जिमाका) : राज्य निवडणूक आयोगाच्या ३ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या निवडणूक कार्यक्रम आदेशानुसार जिल्ह्यात नोव्हेंबर २०२३ मध्ये ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. ही निवडणूक लढविलेल्या उमेदवारांनी ट्रू व्होटर ॲपचा वापर करून ६ डिसेंबर २०२३ पर्यंत निवडणूक खर्च हिशोब सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु, ज्या उमेदवारांना ट्रू व्होटर ॲप डाऊनलोड करणे शक्य नाही, अशा उमेदवारांना ६ डिसेंबर २०२३ पर्यंत पारंपारिक पद्धतीने निवडणूक खर्च सादर करण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडणूक लढविलेल्या बिनविरोध उमेदवारांसह सर्व उमेदवारांनी ६ डिसेंबर २०२३ पर्यानात निवडणूक खर्च सादर करण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी केले आहे.

## भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा लातुर शहरजिल्हा कार्यकारीणी जाहिर

लातूर :- भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष ईद्रिस मुल्तानी, जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यु पवार, आ. रमेशअप्पा कराड यांच्या निर्देशानुसार भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा लातुर शहर जिल्हा कार्यकारीणी अल्पसंख्यांक मोर्चा शहर जिल्हाध्यक्ष मोहसिनभाई शेख यांनी जाहिर केली.

अल्पसंख्यांक मोर्चा लातुर शहर जिल्हा कार्यकारिणी मध्ये उपाध्यक्ष किशोर प्रेमचंद जैन, पठाण रियाजखाँन रशिदखाँन, सय्यद वाजीद, सय्यद युसुफ, तायप्पा कांबळे, सरचिटणिस पठाण अमजदखाँन राजाखाँन, शेख जमिर जिलानी, चिटणीस शेख नय्युम, शेख सालार , कुरैशी अजगर, मुस्तफा(रफीक) शेख, कोषाध्यक्ष अरबाजखाँ पठाण, सदस्य शेख सद्दाम, शेख शमशोद्दिन, शेख जावेद, सय्यद मोहसिन, शेख सलीम, शेख जावेद, शेख ईम्तीयाज,पटेल एजाज, अल्पसंख्यांक युवा अध्यक्ष शेख महंमद गफुर मिस्त्री, ओबीसी आघाडी अध्यक्ष हाजी खय्युम तांबोळी, दिव्यांग मोर्चा आघाडी अध्यक्ष कासिम पठाण, टुव्हिलर मँकेनिक आघाडी अध्यक्ष सय्यद निसार, परिवहन ट्रान्सपोर्ट आघाडी अध्यक्ष शेख सलीम मैनोद्दिन, शिक्षक आघाडी अध्यक्ष पठाण वाजीद, सोशल मिडीया प्रमुख वसिम पटेल यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकपर भाषणात बोलताना जिल्हाध्यक्ष मोहसिनभाई शेख यावेळी म्हणाले की शहरातील अल्पसंख्यांक समाज हा परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. तसेच भाजपासोबत समाजाला जोडण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असे यावेळी म्हणाले.

# महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या



मुंबई : गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या झाल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. महाराष्ट्रातच एका वर्षात २२,७४६ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. त्यापाठोपाठ तामिळनाडूमध्ये १९,८३४ लोकांनी आत्महत्या केल्या आहेत. कर्जबाजारीपणाच्या विळख्यात अडकून आणि दिवाळखोरीमुळे आत्महत्या करणा–यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो अहवालातून ही धक्कादायक आणि लाजिरवाणी आकडेवारी उघड झाली आहे.राज्यात दिवाळखोरी किंवा कर्जबाजारीपणामुळे १९४१ आत्महत्या झाल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यानंतर कर्नाटकात १३३५ आणि आंध्र प्रदेशात ८१५ जणांनी दिवाळखोरी किंवा कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या. राज्यात बेरोजगारीमुळे ६४२, गरिबीमुळे ४०२ आणि व्यावसायिक जीवनातील समस्यांमुळे ६४० नागरिकांनी आपले आयुष्य संपवले आहे.राज्यात कौटुंबिक समस्यांमुळे आत्महत्या करणा–यांची संख्या सर्वाधिक असल्याची बाबही निदर्शनास आली आहे. गेल्या वर्षभरात कौटुंबिक कारणांमुळे जवळपास ६९६१आत्महत्या झाल्याचे अहवाल सांगतो. महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्य प्रदेश, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांमध्ये मिळून देशातील एकूण आत्महत्यांपैकी ४९.३ टक्के आत्महत्या झाल्याचे धक्कादायक वास्तवही समोर आले आहे.देशात दर तासाला १९ आत्महत्या २०२१ मध्ये १,६४,०३३ आत्महत्या झाल्या होत्या तर, २०२२ मध्ये १,७०,९२४ आत्महत्या झाल्या. यापैकी सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात १३.३ टक्के, तामिळनाडूमध्ये ११.६ टक्के, मध्य प्रदेश नऊ, कर्नाटक आठ आणि पश्चिम बंगालमध्ये ७.४ टक्के नोंदल्या गेल्या आहेत. आकडेवारीच्या दृष्टिकोनातून गणना केली तर २०२२ मध्ये देशात दर तासाला १९ लोक आत्महत्या करतील. शेती क्षेत्रात दर तासाला एकापेक्षा जास्त शेतकरी आणि शेतमजूर आत्महत्या करतात.गंभीर आजारही आत्महत्येचे कारण देशभरातील १८.४ टक्के आत्महत्यांमागे गंभीर आजार हे कारण होते. १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये रोगामुळे होणा–या आत्महत्यांचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, पंजाब, तामिळनाडू, सिक्कीम आणि गोवा या राज्यांमध्ये रोगामुळे आत्महत्या करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना
६७ व्या महापरिनिर्वाण
दिनानिमित विनम्र अभिवादन







आयु.सागर रामभाऊ तायडे.
मो. ९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.

# नौदलाच्या गणवेशावर शिवरायांची राजमुद्रा

सिंधुदुर्ग : प्रतिनिधी भारताने आज गुलामीची मानसिकता मागे टाकली. यामागे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आहे. नौदलाच्या ध्वजाला मागच्या वर्षी शिवाजी महाराजांच्या विचारांशी जोडण्यात आले, हे माझे भाग्य आहे. आता नौदलाच्या गणवेशावर शिवरायांची राजमुद्रा असेल आणि नौदलाच्या पदांना भारतीय पद्धतीची नावे देणार असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिंधुदुर्ग दौ–यावर आले होते. आज नौदल दिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी सिंधुदुर्ग येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. तारकर्ली येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषणा केली. यावेळी केंद्रीय मंत्री नारायण राणे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान पुढे म्हणाले की, कोणत्याही देशासाठी समुद्री सामर्थ्य किती महत्त्वाचे असते, हे छत्रपती शिवाजी महाराज ओळखून होते. त्यामुळे त्यांनी शक्तिशाली नौसेना बनवली. त्यांचे सगळे मावळे आपल्यासाठी प्रेरणादायी आहेत. भारताने आज गुलामीची मानसिकता मागे टाकली आहे, ती छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आहे.थरारक प्रात्याक्षिके दरम्यान, नौदल दिनानिमित्त येथे नौदलाच्या वतीने येथे हवाई प्रात्याक्षिकही सादर करण्यात आली. यावेळी विमानांची थरारक उड्डाणे मोदींच्या उपस्थितीत पाहता आली. या थरारक उड्डाणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. यावेळी हवाई दलाचेही कौतुक करण्यात आले.आता सशस्त्र दलात नारीशक्ती वाढविणार सशस्त्र दलांमध्ये नारीशक्ती वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरु आहेत. नौसेनेचे अभिनंदन करतो की, नेव्हलशीपमध्ये देशातल्या

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE